# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जळगाव दि.२४ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील तसेच मान्यता प्राप्त संस्थांमधील शारीरिक शिक्षण संचालकांसाठी दि.२९ जुलै ते १ ऑगस्ट, २०१९ या कालावधीत क्रीडा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या चार दिवसीय शिबिरात कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहूलीकर, कुलसचिव भ.भा.पाटील, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य तसेच विविध क्रीडा तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील शारीरिक शिक्षण संचालक, क्रीडा संचालक तसेच क्रीडा विभागाचे कामकाज पाहणाऱ्या प्राध्यापकांनी शिबिरात सहभागी व्हावे. तसेच ज्या महाविद्यालयात कनिष्ठ् महाविद्यालय असेल अशा कनिष्ठ् महाविद्यालयातील क्रीडा शिक्षकांना सुध्दा या शिबिरात सहभागी होता येईल. शिबिरात सहभागी होण्यासाठी प्राचार्यांचे सहभागी होण्याबाबचे पत्र सोबत आणावे. या क्रीडा शिबिरासाठी नोंदणी शुल्क रूपये ७००/- व येण्याजाण्याचा प्रवास खर्च संबंधित महाविद्यालयाने करावयाचा आहे. या शिबिरात सहभागी होण्यासाठी दि.२८ जुलै,२०१९ रोजी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत उपस्थित रहावे. असे क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील यांनी कळविले आहे.

---

जा.क्र.कबचौउमवि/१६/बातमी-क्रीडा/हस्तदेय/२०१९ दि.२४ जुलै, २०१९

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
-----------------------

कृपया, आपल्या लोकप्रिय दैनिकातून उपरोक्त बातमी प्रसिद्ध करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(प्रमोद आ.चव्हाण)
जनसंपर्क अधिकारी यांच्या करिता